जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
बी.केम.आर.डी.ए.इमारत, २रा मजला,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

वाचले :-

दिनांक:- २९ ऑक्टोबर, १९९३.

१) विभाग अधिकारी के/डब्ल्यू विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका यांचे पत्र क्र.केडब्ल्यू/१६६२२/एइएम/दि.२८.९.१९९३..

२) प्रश्नाधीन जमिनीचा तयार करण्यात आलेला अभिन्यास क्र.१..

आदेश :-

मौजे वर्सोवा तालुका अंधेरी येथील स.नं.१६१ लगतच्या खाडी जमिनीपैकी ५९८६.५७चौ.मी.जमिनीची बगीच्यासाठी मागणी केली आहे. परंतु प्रश्नाधीन जमिनीच्या तयार करण्यात आलेल्या अभिन्यासाप्रमाणे २४८९.४३चौ.मी. क्षेत्र निवास कारणासाठी १६२४.७९चौ.मी. क्षेत्र बगीच्याकरिता (जी- १)व उर्वरित ८७२.३५चौ.मी. क्षेत्र रिक्रिएशन ग्राऊंडसाठी आरक्षित आहे. बगीच्यासाठी व रिक्रिएशन ग्राऊंडसाठी आरक्षित असलेल्या जमिनीचा किताब मुंबई महानगर पालिकेने करावयाचा असल्यामुळे प्राथमिक कार्यवाही पूर्ण करून जमीन मुंबई महानगर पालिकेस मंजूर करण्यासाठी अंतिम आदेश काढण्याच्या कालावधीत जमिनीवर अतिक्रमण होण्याचा धोका लक्षात घेऊन मी, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा खालील अटींच्या अधीन राहून असे आदेश देतो की, प्रश्नाधिन जमिनीपैकी सोबतच्या नकाशावर दर्शविल्याप्रमाणे जी जमीन बगीच्या व रिक्रिएशन ग्राऊंडसाठी आरक्षित आहे तीचा आगाऊ ताबा बृहन्मुंबई महानगर पालिकेस डी.सी. रेग्युलेशन ॲक्ट १९९१ अन्वये किंवा एवढ हस्तांतराने शासनाचे इतर जमीनीवर तत्पृष्ठ निर्देशांक वाढवून मिळण्याच्या अटींवर देण्यात यावा.

अटी:-

१) हे आदेश शासनाच्या अंतिम आदेशाच्या अधीन असतील.

२) बृहन्मुंबई महानगरपालिकेला शासन ठरविल ती कब्जेहक्काची रक्कम मान्य करावी लागेल. तसेच अंतिम कब्जेहक्काची रक्कम ही तात्पुरत्या कब्जेहक्काच्या रकमेपेक्षा जास्त असल्यास दोन्हीतील फरकाची रक्कम, जमिनीचा ताबा घेण्याच्या तारखेपासून पूर्ण रक्कम भरण्याच्या तारखेपर्यंत विहीत व्याजदराने भरेल.

३) वरील जमिनीचा वापर किंवा आरक्षणानुसार करावा अन्य प्रयोजनासाठी करता येणार नाही.

४) जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी मुंबई महानगर पालिकेची राहील.

५) बृहन्मुंबई महानगर पालिकेला शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय प्रश्नाधीन जमिनीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतर करता येणार नाही.

कृ.मा.पहा.

Scanned by CamScanner

६) विहीत नमुन्यातील करारनाम्यावर स्वाक्षरी करण्यास जेव्हा बोलाविण्यात येईल, तेव्हा मुंबई महानगर पालिकेच्या वतीने नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यांस या कार्यालयात येऊन करारनाम्यावर स्वाक्षरी करावी लागेल.

७) वरील १ ते ६ अटी मान्य असल्याबाबतचे रु.१०/- च्या मुद्रांकशुल्क पेपरवरील हमीपत्र मुंबई महानगर पालिका ७ दिवसांत या कार्यालयास सादर करेल.

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता.

प्रतिलिपी:-
------------

विभाग अधिकारी के/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, अंधेरी बेस्ट बस स्थानकासमोर, स्वामी विवेकानंद मार्ग, अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५८ यांजकडे रवाना.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, अट क्र.७ नुसार हमीपत्र या कार्यालयात सादर करावे. हमीपत्र सादर केल्यानंतर जागेचा आगाऊ ताबा देण्याबाबत नगर भूमापन अधिकारी यांना कळविण्यात येईल.

प्रतिलिपी:- नगर भूमापन अधिकारी क्र. ४ यांजकडे रवाना.

२/- सोबतच्या नकाशावर दर्शविलेली बगीच्या-च रिक्रीएशन ग्राऊंडसाठी आरक्षित असलेल्या जमीनीचा ताबा मुंबई महानगर पालिकेस देण्याचा आहे. सदर जागेची मोजणी करावी. महापालिकेने हमीपत्र दिल्यानंतर तसे कळविण्यात येईल. तेव्हाच जागेचा आगाऊ ताबा महापालिकेस देऊन ताबापावती व जमीनीच्या मोजणी नकाशाच्या प्रतींसह अहवाल सादर करावा.

प्रतिलिपी:- तहसिलदार अंधेरी यांजकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

२/- जागेचा ताबा महापालिकेस देतांना मंडलाधिकारी यांना जागेवर उपस्थित राहाण्यास सांगावे.

प्रतिलिपी:- मा. अवर मुख्य सचिव (महसूल) महसूल व बन विभाग मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.

स्थळप्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता.

पीएलएस.२५१२९३.